PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Navri Mile Navryala
Year: 1984

Song: Hi Navri Asali
Lyricist:

ही नवरी असली
अरे ही मनात ठसली
ही नवरी असली
अरे ही मनात ठसली
हिचा नखरा पाहून
काळीज उडतंय
हो हो हो...
धकधक धकधक
हा नवरा असला
अरे हा कोपऱ्यात बसला
हा नवरा असला
अरे हा कोपऱ्यात बसला
मला येता जाता
चोरून बघतोय
हो हो हो...
टकमक टकमक
ही नवरी असली
अरे ही मनात ठसली
हो हो हो हो...

मनातलं सारं सांगून गेली
कशी जिरवली खोडी
सपनात आता रंगून जाईल
दो हंसोंकी जोडी
मनातलं सारं सांगून गेली
कशी जिरवली खोडी
सपनात आता रंगून जाईल
दो हंसों की जोडी
ही पोरगी पटली
हो नवरी नटली
हे हे ही पोरगी पटली
हो नवरी नटली
पोर शालू नेसून
चमकत जाईल
हो हो हो...
लखलख लखलख
हा नवरा असला
अरे हा हा कोपऱ्यात बसला
ही नवरी असली
अरे ही मनात ठसली
हो हे हे हे...

लगीन झाल्यावर दावीन इंगा
समजू नको मला भोळी
कजाग बायको झालीस तर मी
देईन फुटाची गोळी
जा...
लगीन झाल्यावर दावीन इंगा
समजू नको मला भोळी
अगं कजाग बायको झालीस तर मी
देईन फुटाची गोळी
मी हुकमाची राणी
तुला मी पाजीन पाणी
मी हुकमाची राणी
जा तुला मी पाजीन पाणी
आता तांडव सोडून
मांडव घालू ये ये ये...
लगबग लगबग

Literacy for a Billion

ही नवरी असली
अरे ही मनात ठसली
हिचा नखरा पाहून
काळीज उडतंय
हो हो हो...
धकधक धकधक
हा नवरा असला
अरे हा मनात ठसला
मला येता जाता
चोरून बघतोय
हो हो हो...
टकमक टकमक
ही नवरी असली
अरे ही मनात ठसली
हा नवरा असला
अरे हा मनात ठसला
हो हे...हो हे... हो हे...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*